REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER – 2017

# भारतातील पर्यटन क्षेत्राचे भारताच्या आर्थिक विकासातील योगदान

डॉ. संगीता तानाजी साळवे
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. अरविंद ब तेलंग कॉलेज, निगडी, पुणे.



**प्रस्तावना:**

भारत भूमी ही निसर्ग सौंदर्याने फुललेली भूमी समजली जाते. समुद्र किनारा, हिमालयासारख्या उंच शिखराच्या डोंगर रांगा, झाडा झुडपांनी बहरलेली जंगले, जंगलांमधून आढळणारी दुर्मिळ वनसंपत्ती आणि प्राणीसंपत्ती यामुळे भारतात पर्यटन उदयोग आधुनिक काळात मोठया प्रमाणावर विकसीत होत आहे. विविध जाती धर्मांनी आणि परंपरेने बांधलेले समाजजीवन, वेगवेगळया चालीरिती, रूढीपरंपरा, पोशाख, खादयपदार्थ, वेशभूषा याबाबत आढळणारी विविधता ही पर्यटन विकासाला पूरक असल्यानेच भारतात पर्यटन व्यवसाय आज विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

भारतात जेव्हा ब्रिटिशांनी पहिली रेल्वे सुरू केली त्यानंतर पर्यटन क्षेत्रास सुरूवात झाली. इ.स. १९४५ मध्ये सर जॉन सर्जंट यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. त्यानंतर स्वतंत्र पर्यटन विकासासाठी मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. १९५६—५७ नंतर पर्यटन व्यवसायाचा स्वतंत्र विचार सुरू झाला. भारतात उन्हाळा, हिवाळा व पावसाळा हे तिन्ही ऋतुंचा समावेश असल्याने या तिन्ही हंगामात पर्यटक पर्यटनासाठी जावू शकतात. भारतात ऐतिहासिक वास्तू, किल्ले, राजवाडे, दरबार, प्रेक्षणिय स्थळे, उदयाने, थंड हवेची ठिकाणे, नदया, प्रादेशिक नैसर्गिक संपन्नता असल्याने देशांतर्गत व परदेशी पर्यटक पर्यटनासाठी जास्त उत्सुक असतात.

पर्यटन व्यवसायाची व्याख्या: स्वीस प्राध्यापक हुंसीकर व क्रॅप्ट यांच्या मते, पर्यटन म्हणजे कायम स्वरूपीची वस्ती न करण्याच्या हेतूने अनिवासी व्यक्तींच्या सहवासतून आर्थिक उत्पादनाशिवाय असलेली भ्रमंती होय.

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, पर्यटक हे केवळ स्वआनंद, आत्मिक समाधान आणि सामाजिक सहकार्य मिळण्याच्या हेतूनेच एका ठिकाणाहून दुस—या ठिकाणी भ्रमंती करतात. पर्यटन क्षेत्राकडून सामाजिक आणि आर्थिक बदल मोठया प्रमाणात घडून येतात तसेच देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने पर्यटन हा उदयोग महत्वाचा ठरतो. पर्यटन उदयोगांचे आर्थिक विकासातील महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१.रोजगारात वाढ: पर्यटन स्थळी पर्यटकांच्या अन्न, पाणी, निवारा या गरजा भागविण्याच्या दृष्टीने स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होवू शकतो म्हणजेच रोजगार वृद्धीच्या दृष्टीने पर्यटन स्थळांचा विकास महत्वाचा ठरतो.

२.पायाभूत सेवा सुविधा: पर्यटकांचा प्रवास सुखकर झाला तर पर्यटकांची संख्या वाढू शकते. परिणामी वाहतूक व दळणवळणाच्या सुविधांमध्ये, उर्जा स्त्रोतांमध्ये वाढ होते.

३. पर्यटन क्षेत्राच्या परिसरात शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ: पर्यटन क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधांमध्ये वाढ होते.

४. व्यापारात वाढ: पर्यटनस्थळी खादयपदार्थ, फळे,

फुले, पुस्तके, विविध आकर्षक वस्तू यांची मागणी जास्त असल्याने या वस्तुंच्या व्यापारात वाढ होवून स्थानिक वस्तुंच्या मागणीत वाढ होते.

५. सामाजिक सुविधांमध्ये वाढः पर्यटन स्थळांच्या विकासासाठी पर्यटकांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने यंत्रणा उभारली जाते. माहिती तंत्रज्ञानाचा विकास होतो. प्रादेशिक स्तरावरील दुर्मिळ वस्तुंचे, परंपरेचे जतन करण्याची प्रवृत्ती वाढते.

६. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होतेः पर्यटन व्यवसायामुळे परदेशी चलनात वाढ होते. त्यामुळे गुंतवणूकीस प्रेरणा मिळते व राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकण्याच्या दृष्टीने पर्यअन क्षेत्र महत्वाचे ठरते.

अशा प्रकारे अनेक आर्थिक वृद्धी व विकास घडवून आणणा—या घटकांत वाढ होवून पर्यटन उदयोग हा आर्थिक विकासाच्या दृश्टिने महत्वाचा उदयोग मानला जातो. आज पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी शासन अनेक पावले उचलत असल्याचे दिसून येते.

भारताच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे महत्व काही पुढील मुददयांव्दारे अभ्यासता येईल.

### अ. भारतात आलेल्या पर्यटकांची संख्याः

**तक्ता क्र.१: भारतात येणा—या विदेशी पर्यटकांची संख्या**

| वर्श | परकीय पर्यटकांचे आगमन कोटी | टक्केवारी |
|---|---|---|
| १९९८ | २.३६ | —०.७ |
| १९९९ | २.४८ | ५.२ |
| २००० | २.६५ | ६.७ |
| २००२ | २.३८ | —६.० |
| २००६ | ४.४५ | १३.५ |
| २०१० | ५.७८ | ११.८ |
| २०११ | ६.३१ | ९.२ |
| २०१२ | ६.५८ | ४.३ |
| २०१३ | ६.९७ | ५.९ |
| २०१४ | ७.६८ | १०.२ |

संदर्भः India Tourisam Statistics at a Glance 2014 pp. 02

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९९८ मध्ये परदेशी पर्यटकांच संख्या कमी झाली होती परंतु २००६ ते २०११ पर्यंत त्यात वाढ होत गेली. २००६ मध्ये सर्वात जास्त म्हणजे १३.५ टक्केने पर्यटक वाढलेले दिसून येतात. २०११ नंतर भारतात सातत्याने होणारे चढउतार व दहशतवादी हल्ले यामुळे परदेशी पर्यटकांची भारतात येणा—यांची संख्या घटत गेली आहे. भारतातील सेवा क्षेत्राचे उत्पन्न वाढत असताना पर्यटन क्षेत्रामध्ये परदेशी पर्यटकांमुळे उत्पन्नात वाढ झालेली नाही असे म्हणावे लागेल. भारतात इतर देशांपेक्षा नैसर्गिक साधनसामग्री, लोकसंख्या व इतर विकसीत देशापेक्षा जास्त असून देखील पर्यटन क्षेत्राला परकीय पर्यटकांची पसंती तुलनेने कमी असल्याचे दिसून येते.

**ब. परकीय चलनातील उत्पन्नः** राष्ट्रीय उत्पन्नात परकीय चलनाचा साठा वाढणे आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वाचे असते. परकीय पर्यटकांनी भारतात आगमन केल्यास प्रत्यक्ष परकीय चलनात वाढ होवू शकते. म्हणून भारतात गेल्या २० वर्शात पर्यटनामुळे परकीय चलन किती उपलब्ध झाले हे खालील आकडेवारीवरून अभ्यासता येईल.

**तक्ता क्र.२: परकीय चलनातील उत्पन्न (डॉलर कोटीमध्ये)**

| वर्श | परकीय चलनातील उत्पन्न डॉलर कोटीमध्ये | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|
| १९९८ | २९४८ | २.० |
| २००० | ३४६० | १५.० |
| २००१ | ३१९८ | —७.६ |
| २००३ | ४४६३ | ४३.८ |
| २००४ | ६१७० | ३८.२ |
| २००७ | १०७२९ | २४.३ |
| २००८ | ११८३२ | १०.३ |
| २०१० | १४१९३ | २७.५ |
| २०११ | १६५६४ | १६.७ |
| २०१३ | १८४४५ | ४.० |
| २०१४ | २०२३६ | ९.७ |
| २०१५ | १३०१७ | —१.३ |

संदर्भ: Government of India, Ministry of Tourism] 2011-15, Indian Tourism Statistical At a Glance, pp. 4

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, १९९८—२००१ पर्यंत पर्यटकांची संख्या वाढत असल्याने त्यामार्फत मिळणा—या आंतरराष्ट्रीय चलनाची संख्या वाढली आहे. २००३ मध्ये परकीय पर्यटकांपासून मिळणारे उत्पन्न ४३.८ टक्क्यांनी वाढले परंतु त्यानंतर मात्र सातत्याने परकीय चलन मिळण्यात घट झालेली दिसून येते. २००४—०५ पासून आलेल्या जागतिक मंदीमुळे २०१० पर्यंत परकीय पर्यटकांकडून मिळणा—या उत्पन्नात घटक झालेली आहे. २०१०, २०११ या कालावधीत मात्र परकीय पर्यटकांपासून मिळणा—या उत्पन्नात वाढ झाली. २०१२ पासून भारतात झालेला राजकीय बदल आणि नैसर्गिक अस्थिरता यामुळे परदेशी पर्यटकांची संख्या घटल्याने भारताचे उत्पन्न घटत आहे.

### क. भारतात सर्वांत जास्त पर्यटक भेट देतात असे देश:

भारतात सर्वांत जास्त कोणत्या देशांकडून पर्यटक पर्यटन करण्यास पसंती दर्शवितात याविषयी अभ्यासले असता पुढील आकडेवारी उपलब्ध होते.

**तक्ता क्र.३: भारतात सर्वांत जास्त पर्यटक भेट देतात असे देश**

| अ.क्र. | देशाचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अमेरिका | १४.५७ |
| २. | बांग्लादेश | १२.२७ |
| ३. | इंग्लंड | १०.९२ |
| ४. | श्रीलंका | ०३.९३ |
| ५. | रशिया | ०३.५१ |
| ६. | कॅनडा | ०३.५० |
| ७. | मलेशिया | ०३.४१ |
| ८. | फ्रान्स | ०३.२० |
| ९. | ऑस्ट्रेलिया | ०३.१२ |
| १०. | जर्मनी | ०३.११ |
| | एकूण | ६१.५६ |

संदर्भ: India Tourism Statistics at a Glance 2014 pp. 04

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, अमेरिका आणि इंग्लंड या देशामधून परकीय पर्यटकांनी भारतात जास्त भेटी दिलेल्या आहेत. बांग्लादेशामधून व्यापार आणि उत्पन्न मिळण्याच्या हेतूने जास्त पर्यटक भारतात आकर्षित होतात. परंतु युरोपीय देशातून आणि ऑस्ट्रेलिया व कॅनडा या देशातून भारतात सर्वात कमी पर्यटक भेटी देतात त्याचे प्रमाण केवळ ३ टक्के असल्याचे दिसून येते.

### ड. भारतातील दहा राज्यात परदेशी पर्यटकांनी दिलेल्या भेटी:

भारतातील कोणत्या राज्यांना परदेशी पर्यटकांनी प्राधान्याने भेटी दिल्या हे अभ्यासले असता पुढील राज्यांविषयी माहिती मिळते. यावरून कोणत्या राज्यांमध्ये अदयापपर्यंत परदेशी पर्यटक पोहचले नाहित याबददल माहिती उपलब्ध होते.

**तक्ता क्र. ४: भारतातील दहा राज्यात परदेशी पर्यटकांनी दिलेल्या भेटी**

| अ.क्र. | राज्याचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | तामिळनाडू | २०.६ |
| २. | महाराष्ट्र | १९.४ |
| ३. | उत्तरप्रदेश | १२.९ |
| ४. | दिल्ली | १०.३ |
| ५. | राजस्थान | ०६.८ |
| ६. | पष्चिम बंगाल | ०६.१ |
| ७. | केरळ | ०४.१ |
| ८. | ब्बिहार | ०३.७ |
| ९. | कर्नाटक | ०२.५ |
| १०. | हरयाना | ०२.४ |
| | एकूण | ८८.८ |

संदर्भ: India Tourism Statistics at a Glance 2014, pp. 13

परदेशी पर्यटक भारतातील कोणत्या राज्यात जास्त भेटी देतात हे अभ्यासले असता असे निदर्शनास येते की, तामिळनाडू, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश या राज्यांत परदेशी पर्यटक जास्त येतात. परंतु राजस्थानमध्ये परदेशी पर्यटकांसाठी आकर्षित करण्यासाठी भरपूर संधी आहेत. केरळ, बिहार, हरयाना, कर्नाटक या राज्यांमध्ये परदेशी पर्यटकांनी भेटी देण्याचे प्रमाण फारच कमी आहे. या राज्यांच्या आर्थिक विकासासाठी या राज्यांमध्ये सरकारने पर्यटन क्षेत्रात मोठया प्रमाणावर गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे.

### इ. रोजगार:

भारतामध्ये २०१४ च्या आकडेवारीनुसार २३०२३००० एवढा रोजगार निर्माण पर्यटन क्षेत्रापासून निर्माण झाला आहे. एकूण रोजगाराच्या ५.५ एवढे त्याचे प्रमाण आहे. २०१५ मध्ये या रोजगारात १.९ टक्के वाढ होवून हे प्रमाण २३४५५५०० एवढे झालेले दिसते. हा रोजगार हॉटेल, ट्रॅव्हल एजन्सी, विमान वाहतूक, प्रवासी वाहतूक सेवा आणि संगणक सेवामध्ये निर्माण झालेला दिसून येतो.

**तक्ता क्र ५: पर्यटन व्यवसायामुळे भारतातील रोजगार निर्मिती—२०१४**

| रॅंकिंग | देश | २०१४ मधील रोजगार |
|---|---|---|
| १ | चीन | ६६०८६.२ |
| २ | भारत | ३६६९५.४ |
| ४ | इंडोनेशिया | ९८१३.९ |
| ७ | थायलंड | ५३८२.९ |
| १२ | व्हिएतनाम | ४०८८.६ |
| १४ | पाकिस्तान | ३४८०.० |
| २० | कंबोडिया | २२२१.५ |
| २३ | बांग्लादेश | १९८४.१ |
| २४ | मलेशिया | १७६९.९ |
| ४२ | श्रीलंका | ०८१९.६ |

संदर्भ: WTTC, Travel and Tourism Economic Impact, pp.7

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की,पर्यटन क्षेत्रापासून रोजगार निर्माण करणारे देश पाहिले तर चीनचा पहिला क्रमांक तर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. थायलंड, मलेशिया, पाकिस्तान, बांग्लादेश या देशांमध्ये भारतापेक्षा कमी रोजगार निर्मिती झालेली दिसून येते. श्रीलंकेमध्ये सर्वात कमी रोजगार निर्माण होत असल्याचे दिसून येते.

**फ.जगातील अनेक देशांच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनात पर्यटन क्षेत्राचे योगदान:**

जगातील एकूण पर्यटन क्षेत्राचा एकूण स्थुल देशांतर्गत उत्पादनामधील प्रमाण व रॅंकिंग पाहिले तर चीन सर्वात जास्त व त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. परंतु भारतापेक्षा चीनचे पर्यटन क्षेत्रातील प्रमाण खूप जास्त म्हणजे भारताचे ४०.६ टक्के तर चीनचे २६३.० इतके आहे. पाकिस्तानचे ७.१ तर बांग्लादेश ३.८ इतके कमी आहे. यावरून असे म्हणता येईल की भारताला पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी चांगली संधी आहे. हे खालील तक्त्यावरून अभ्यासता येईल.

**तक्ता क्र.६: जगातील अनेक देशांच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनात पर्यटन क्षेत्राचे योगदान:**

| रॅंकिंग | देश | पर्यटनाचा जीडीपी मधील हिस्सा |
|---|---|---|
| २ | चीन | २६३.० |
| ११ | भारत | ४०.६ |
| १४ | थायलंड | ३१.९ |
| २३ | मलेशिया | १८.६ |
| ४३ | व्हिएतनाम | ०८.६ |
| ४८ | पाकिस्तान | ०७.१ |
| ५९ | बांग्लादेश | ०३.८ |
| ६३ | श्रीलंका | ०३.५ |
| ७४ | कंबोडिया | ०२.३ |

संदर्भ: WTTC, Travel and Tourism Economic Impact, pp.7

वरील विश्लेषणावरून पुढील निष्कर्ष काढता येतील—

१. भारतात परदेशी पर्यटकांची संख्या २०११ पासून वाढ असली तरी त्यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे.
२. भारतात रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, जर्मनी या देशांमधून येणा—या पर्यटकांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी पायाभूत सेवा व सुविधांमध्ये वाढ होणे आवश्यक आहे.

३. परदेशी पर्यटकांची संख्या कमी असल्यामुळे भारतातील पर्यटन क्षेत्रापासून मिळणारे उत्पन्न कमी आहे. २०१५ मध्ये ते सर्वांत कमी असल्याचे दिसून येते.
४. भारतातील केरळ, कर्नाटक व बिहार या राज्यांत परकीय पर्यटकांची संख्या वाढविण्यासाठी शासनाने या राज्यांमध्ये दळणवळण, वाहतूक, प्रवासी सेवा व सुविधा, हॉटेल, रेस्टॉरंट याच्या विकासाला प्राधान्य दिले पाहिजे.
५. सेवा सुविधांमध्ये वाढ व त्याचा उत्तम दर्जा निर्माण करून दिल्यास भारताच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनामध्ये पर्यटन क्षेत्राचे उत्पन्न निश्चितपणे वाढू शकते.
६. भारतात बेकारीचे प्रमाण कमी करून रोजगार वृद्धीसाठी पर्यटन क्षेत्र महत्वाचे आहे.

## संदर्भग्रंथ सुची:

१. भारत सरकार, पर्यटन मंत्रालय, वार्षिक अहवाल २०११
२. India Tourism Statistics at a Glance 2014 pp. 02
३. जागतिक वर्ल्ड ट्रॅव्हल ॲण्ड टूरिझम अहवाल, २०१०
४. Government of India, Ministry of Tourism, 2011-15, Indian Tourism Statistical At a Glance, pp. 4
५. WTTC, Travel and Tourism Economic Impact, pp.7